RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष १, अंक १०८(४)] शनिवार, सप्टेंबर २६, २०१५/आश्विन ४, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २३२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

५ वा मजला (ॲनेक्स), हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ सप्टेंबर २०१५

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए. १०९१/प्र.क्र. ५/राउशु-२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, मुंबई मळी नियम, १९५५ मध्ये आणखी सुधारणा करून ते तात्काळ अंमलात आणावेत, आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) (ज्याचा यापुढे " उक्त अधिनियम " असा निदेश केलेला आहे.) च्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे हे नियम आधी प्रकाशित न करता ते करण्यात यावेत.

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १४३ च्या पोट-कलम २ मधील खंड (एच-१) च्या उपखंड ६ आणि खंड (बी) (एफ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन मुंबई मळी नियम १९५५ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना मुंबई मळी (सुधारणा) नियम, २०१५ असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई मळी नियम, १९५५ (यापुढे ज्याचा " प्रधान नियम " असा उल्लेख आहे) मधील नियम २२ मधील " मळीची साठवणूक टाक्यांमध्ये किंवा इतर पात्रात करताना त्यांच्यावर अनुज्ञप्तीधारकाने अनुक्रमांक लिहिला पाहिजे " या शब्दांऐवजी " मळीची साठवणूक करणाऱ्या सर्व टाक्या स्टिलच्या गळती विरहित (लिक प्रुफ), पूर्णपणे आच्छादित असाव्यात व त्यांच्यावर अनुज्ञप्तीधारकाने अनुक्रमांक लिहिले पाहिजे " हे शब्द समाविष्ट करावेत.

३. प्रधान नियमांच्या नियम २४ मधील " निरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांनी मागणी केल्यानुसार अनुज्ञप्तीधारकाने निरीक्षण अधिकाऱ्याने सुचविलेल्या पद्धतीने मळीचे मोजमाप केले पाहिजे आणि ही पद्धत जास्त योग्य आणि व्यवहार्य असेल " या शब्दांऐवजी " मळी आणि मळीची वाहतूक करणाऱ्या वाहनांचे मोजमाप करण्याकरिता भारतीय मानक ब्युरो (BIS) यांनी प्रमाणित केलेले इलेक्ट्रॉनिक वजनकाटा अनुज्ञप्तीधारकास बसवावा लागेल " हे शब्द समाविष्ट करावेत.

४. प्रधान नियमाच्या नियम ३० मधील " सर्वश्री वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, पुणे " या शब्दांच्या नंतर " किंवा संचालक, तांत्रिक शिक्षण यांनी त्याकरिता केलेल्या शिफारशीनुसार आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी राज्यातील सर्व महसुली विभागातील त्या उद्देशासाठी घोषित केलेल्या प्रयोगशाळा किंवा कोणतेही रासायानिक विश्लेषक " हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अं. शा. घार्गे,**
शासनाचे सहसचिव.

**HOME DEPARTMENT**

5 Floor, Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated 9th September 2015

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BPA. 1091/CR-5/Exc-2.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Molasses Rules, 1955 should be brought into force at once, and therefore the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949).

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (*b*) (*f*) and sub-clause (*vi*) of clause (*hl*) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949), the Government of Maharashtra hereby the makes the following rules further to amend the Bombay Molasses Rules, 1955 as follows, namely :—

1. *Short Title*.—These rules may be called the Bombay Molasses (Amendment) Rules, 2015.

2. In Rule 22 of the Bombay Molasses Rules, 1955 (hereinafter referred to as " the principal Rules "), for the words " all storage tanks or receptacles of molasses shall be serially numbered by the licensee " the words, " all storage tanks of molasses shall be of steel, leak proof, fully covered and shall be serially numbered by the licensee " shall be substituted.

3. In rule 24 of the principal rules, for the words " He shall if so required by the inspecting officer weigh or measure molasses by any method which may be suitable or practicable. " the words " He shall install electronic weighments confirming to the Bureau of Indian Standards (BIS) for the purpose of weighing molasses and the vehicles carrying molasses." shall be substituted.

4. In rule 30 of the principal Rules, after the words "M/s. Vasantdada Sugar Institute, Pune " the words " or any chemical analyser or laboratory declared for this purpose in all the revenue divisions in the State of Maharashtra by the Commissioner, State Excise on the recommendations of the Director, Technical Education to that extent " shall be inserted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. GHARGE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.